# आकाशवाणी पुणे
## पुणे वृत्तांत
### वेळ - संध्याकाळी ०६.०० वा.

**दिनांक: २४/०३/२०२४** **वार – रविवार**

**होळी**

शहरात होळी पौर्णिमेची उत्साहात तयारी सुरू आहे. होलिकादहनासाठी शेण गोवऱ्या, नारळाच्या झावळ्या गोळा करणाऱ्या लहानग्यांचा उत्साह रस्तोरस्ती दिसतो आहे. तर घराघरांत होळीला नैवेद्य दाखवण्यासाठी महिलावर्ग पुरणपोळीच्या तयारीत व्यग्र आहेत. आज संध्याकाळी होलिका दहन केलं जाणार आहे. राज्याचे राज्यपाल रमेश बैस, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही नागरिकांना होळीपौर्णिमेच्या शुभेच्छा दिल्या आहेत. या निमित्ताने श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपतीला दोन हजार किलो द्राक्षांची आरास करण्यात आली होती. नाशिकच्या सह्याद्री फार्मर्स प्रोड्युसर कंपनीनं ही आरास केली होती. ही द्राक्षे ससून रूग्णालय, वृद्धाश्रम, अनाथाश्रम आणि भाविकांना वाटण्यात येणार आहे.

**होळी चातुर्मास**

श्री वर्धमान स्थानकवासी जैन श्रावक संघाच्या वतीनं आज पासून २९ मार्च पर्यत पाच दिवसांच्या होळी चातुर्मासाचं आयोजन करण्यात आलं आहे. उपाध्याय प्रवीण ऋषीजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली पंचदिवसीय होळी चातुर्मास संपन्न होणार आहे.

**पाम संडे**

तर ख्रिस्ती समाजाच्या पवित्र आठवड्यालाही आज पाम संडे या दिवसानं सुरुवात झाली. ईस्टर संडे आणि गुड फ्रायडे पुर्वी हा महत्त्वाचा दिवस मानला जातो. चर्चमधून विशेष प्रार्थनेचे आयोजन केलं गेलं.

**बीज**

येत्या बुधवारी साजऱ्या होणाऱ्या तुकाराम बीज निमित्त पुणे महानगर परिवहन महामंडळ म्हणजे पीएमपीएमएल नं नेहमीच्या दरातच, जादा बस गाड्यांची व्यवस्था केली आहे. स्वारगेट, पुणे महापालिका भवन, हडपसर इथून या गाड्या सुटणार आहेत, असं महामंडळातर्फे कळवण्यात आलं आहे.

**ईएसटी**

राज्य परिवहन महामंडळ अर्थात एसटीच्या पुणे विभागात पुढील दोन तीन महिन्यात नव्या ई-बस दाखल होणार आहेत. त्यामुळे विविध मार्गांवर धावणाऱ्या बसची संख्या वाढणार आहे. त्यासाठी चालकांची संख्याही वाढवली असल्याची माहिती पुणे विभाग नियंत्रक प्रमोद नेहूल यांनी दिली आहे. नवीन पाचशे चालक प्रशिक्षणानंतर सेवेत रुजू होणार असल्याचं नेहूल म्हणाले.

**वणवा प्रतिबंध**

पुणे वनविभागाच्या धामणी वन परिमंडलाच्या वतीनं आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातल्या गावांमध्ये वणवा प्रतिबंधक जनजागृती फलक लावण्यात आले आहेत. तसंच अनेक गावांमध्ये गस्त सुरू असून प्रबोधन, जनजागृती केली जात आहे. उन्हाच्या कडाक्यामुळे माळरान, डोंगरात वणवा लागल्यानं, वन्यप्राणी, पक्षी

अधिवास नष्ट होतो. परिणामी वन्यप्राणी आणि मानव संघर्ष वाढतो. त्यामुळे लोकसहभागातून वणव्यापासून जंगल वाचवण्याचे आवाहन पुणे वनपरिक्षेत्र अधिकारी स्मिता राजहंस यांनी केलं आहे.

**अपघात विरहीत वाहातूक**

भविष्यात कार्बनमुक्त आणि अपघातविरहीत वाहातूक व्यवस्था उभारण्यावर भर दिला जात असल्याचं प्रतिपादन ऑटोमेटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडियाचे संचालक डॉ. रेजी मथाई यांनी केलं. वाढत्या इलेक्ट्रीक वाहानांची संख्या लक्षात घेऊन पूरक पायाभूत सुविधा उभारण्याचा प्रयत्न सुरु आहे. सोसायटी ऑफ ऑटोमोटिव्ह इंजिनिअर्स (एसएई) इंडिया आणि ऑटोमोटिव्ह रिसर्च असोसिएशन ऑफ इंडिया (एआरएआय) यांच्या सहकार्यानं 'ऑटोमोटिव्ह फ्युचर ट्रेंड्स'वर चर्चासत्राचे आयोजन केले होते.

**सातारा रेल्वे**

पुणे सातारा रेल्वे मार्गावर दुहेरीकरणाचे काम सुरू असल्यानं २९ मार्च पर्यंत काही गाड्या रद्द करण्यात आल्या आहेत. तर काही गाड्या उशिरानं धावणार आहेत. २६ मार्च रोजी पुणे-मिरज एक्सप्रेस रद्द करण्यात आली आहे. तर कोल्हापूर मुंबई कोयना एक्स्प्रेस उशिराने सुटणार असल्याची माहिती मध्य रेल्वेनं दिली आहे.

**मोहोळ**

पुण्यात भाजप महायुतीकडून पुणे लोकसभेसाठीचे उमेदवार मुरलीधर मोहोळ यांच्या प्रचारासाठी हजारो मल्ल मैदानात उतरणार आहेत. मूळ पैलवान असलेल्या मोहोळ यांच्या विजयासाठी झोकून देण्याचा निर्धार पुणे परिसरातल्या मल्लांनी केला असल्याची माहिती आकाशवाणीच्या प्रतिनिधीनं दिली आहे. दरम्यान, महाविकास आघाडी तर्फे पुणे लोकसभा मतदारसंघासाठी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर रवींद्र धंगेकर यांनी आज पुण्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार गटाचे अध्यक्ष शरद पवार यांची भेट घेतली. पवार यांनी धंगेकरांना विजयासाठी शुभेच्छा दिल्या.

**गुन्हेगार तडीपार**

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर पुणे पोलिसांनी एका दिवसात 12 सराईत गुन्हेगारांना तडीपार केलं आहे. पोलिस आयुक्त रितेश कुमार यांनी हा निर्णय घेतला आहे. खून, जबरी चोरी, दरोडा, महिला अत्याचार, विनापरवाना प्राणघातक शस्त्र बाळगणे, दहशत माजवणे, सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणे, अशा प्रकारचे गंभीर स्वरुपाचे गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांचा यात समावेश आहे.

**क्रिकेट**

पिंपरी चिंचवड इथं सुरू असलेल्या 14 व्या लायन्स प्रिमियर लीग टी -२० क्रिकेट स्पर्धेत, दीक्षित रॉयल्स आणि न्युट्रिलिशिअस संघांनी आपापल्या प्रतिस्पर्धी संघाचा पराभव केला आहे.

**हवामान**

पुण्यात आज कमाल तापमान ३७ अंश तर किमान तापमान १७ पूर्णांक ७ दशांश अंश नोंदवलं गेलं. उद्या तापमान वाढ होऊन कमाल तापमान ३८ तर किमान तापमान १८ अंश सेल्सिअस राहाण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

तर हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू संध्याकाळी ०६.०० वा., विविध भारती पुणे केंद्रावर, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार.